योगप्रकाश

वर्ष ६० | डिसेंबर २०२५ | अंक १

श्री दत्तदेवाय नमो नमः
''अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त''

संस्थापक संपादक : **प.पू.प.प. जनार्दनस्वामी**

आद्य संपादक : **कै. डॉ. श्री. भा. वर्णेकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वि. भा. सावदेकर**

कार्यकारी मंडळ

श्री. अनिल नाजपांडे — श्री. सतीश एलकुंचवार

श्री. शशांक भंडारी — श्री. रमेश अकोलकर

श्री. प्रवीण करपटे — श्री. वसंत नानेकर

श्री. अंकुश मेंदिरत्ता — डॉ. रवीन्द्र केसकर

मुखपृष्ठ व सजावट — श्री. संजय लष्करे

अंतरंग

समाधिस्थ	संपादकीय	४
हठप्रदीपिका (द्रितीयोपदेशः) शुद्धिक्रिया आनंदानुज	– (भाषांतर : रमेश मुलतानी)	९
वेदांमधील योगमीमांसा (लेखमाला – ५)	– डॉ. योगेश वाईकर	१२
यत्र साधको योगस्य यत्र स्वामी जनार्दनः	– सतीश एलकुंचवार	१४
योगवार्ता	---	२२
योगप्रकाश–साहित्य सूची–२०२५	---	३०

–:: लेखातील मते लेखकांची ::–

मुखपृष्ठ संकल्पना – जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष :
योगसंमेलन (पृ.क्र. २२)

योगप्रकाशचे वर्गणीदार व्हा आणि इतरांनाही करा

❊ दीर्घकालीन वर्गणीदार देणगी १५ वर्षांकरिता रु. १०००/–	❊ वार्षिक वर्गणीदार देणगी रु. १००/–
❊ पाच वर्षांकरिता देणगी रु. ५००/–	❊ Online वर्गणीदार देणगी वार्षिक रु. १००/–
❊ अंक दरमहा २० तारखेस प्रसिद्ध होतो.	❊ किरकोळ अंक देणगी रु. १०/–
मंडळाच्या **www.jsyog.org** वर **Online** वर्गणीदार होण्याची सोय आहे.	
E-mail : jsyog@rediffmail.com	**Ph.: 0712-2532329**

योगप्रकाश हे मासिक श्री. राम मोरेश्वर खांडवे, जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ, रामनगर, नागपूर–३३ ☎ ०७१२–२५३२३२९ यांनी महिमा प्रिंटिंग प्रेस, गोकुळपेठ, नागपूर येथे छापून जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळ, रामनगर, नागपूर येथून प्रसिद्ध केले.

आमच्यासाठी स्थितप्रज्ञ, प्रियभक्त, गुणातीत, पुरुषोत्तम या सगळ्यांचं एकच संक्षिप्त उत्तर आहे, 'प.पू. परिव्राजकाचार्य परमहंस गुरुमूर्ती जनार्दनस्वामी महाराज!' अशा महान योग्याच्या पवित्र समाधीच्या परिसरात आपण रोज वावरतो, या समाधिस्थ योग्याच्या साक्षीने यथाशक्ति योगाभ्यास करतो या कल्पनेने आम्ही रोमांचित होतो.

समाधिस्थ

प.पू. स्वामीजींच्या या आश्रमात येऊन किती वर्षे झाली हे मोजणं आता सोडून दिलं आहे. या इतक्या वर्षांमधे सवयींमधे, वागण्या-बोलण्यात काही फरक पडलाय का, असे अडचणीचे व खोचक प्रश्न विचारू नका. पण त्या रूक्ष आणि निरर्थक आकडेवारीत आता रस उरलेला नाही. किती वर्षे झाली हे आता कोणाजवळ मिरवायचं आहे? कुठलं प्रमाणपत्र वा बक्षिस मिळवायचं आहे? म्हणून म्हणतो, की किती संपादकीये लिहिली याची आकडेवारी अद्ययावत करण्यापेक्षा आपली गुरुसेवा, गुरुकार्य अद्यतन ठेवावे. कोणाजवळ फुशारक्या मारायच्या नाहीत, 'मी-मी' करून पुढे पुढे करायचं नाही, की कोणावर प्रभाव टाकायचा नाही.

कारण नातं फक्त स्वामीजींशी आहे. कुठल्या जन्माचं आहे, कोणती पुण्याई आहे माहीत नाही, पण आता बांधलं जायचं ते त्यांच्या कार्यात. स्वामी- कार्याचा हा मोहपाश आमचे पाय त्यांच्या आश्रमात अडकवून ठेवतो. इथून लवकर निघण्याची इच्छा होत नाही. जिथे सगळी घाई, धावपळ, ईर्षा, स्पर्धा संपते, ती जागा म्हणजे प.पू. स्वामीजींची पवित्र समाधी आहे. 'स्वामींच्या चरणी यावे आणि तृप्त होउनि जावे' हा अनुभव अनेकदा घेतलेला आहे.

आता सांगा, या इतक्या वर्षात समाधीचं दर्शन घेताना आम्ही कमी वेळा प्रदक्षिणा घातल्या असतील का समाधीला? समाधीवरच्या स्वामीजीच्या पदचिह्नांवर कमी वेळा माथा टेकवला असेल का? स्वामीजींच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होताना असंख्य वेळा 'अवचिता परिमळु, झुळकला अळुमाळू' ची प्रचिती घेतली असेल की नाही?

गेल्या महिन्यात मात्र समाधिस्थ स्वामीजींबद्दलची जाणीव अचानक खूप तीव्र झाली. आपल्या 'योगप्रकाश'

दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन होते. प्रथेनुसार प्रकाशन समारंभाच्या प्रमुख अतिथींचे आगमन झाल्यावर गुरुजींबरोबर त्यांच्यासह समाधी दर्शन व माल्यार्पणासाठी गेलो होतो. अतिथी व गुरुजींना औक्षवण होत असताना छायाचित्रकारांची तिथे गर्दी झाल्यामुळे मंचाजवळच असलेल्या समाधीजवळ उभा राहिलो. अगदी खरं सांगतो, हाच क्षण अतिशय महत्त्वाचा ठरला. समाधिस्थ स्वामीजीना डोळ्यांसमोर आणलं. तिथले समाधिस्थ स्वामीजी जणू साकार होऊ लागले.

त्याच वेळी गुरुजींचे शब्द तीव्रतेने आठवले. आदल्याच दिवशी निरोगत्व योगासन वर्गात प्रबोधन करताना ते स्वामीजींबद्दल भरभरून बोलले होते. त्यावेळी म्हणाले होते, ''असा हा महान योगी या समाधीत आपल्यासमोर बसलेला आहे. या समाधिस्थ योग्याला साक्षी ठेवून आपण रोज योगाभ्यास करत असतो. नित्य नियमित योगासनांच्या रूपात त्यांची पूजा करतो. गुरुकार्याचा संकल्प करतो. आपली दैनंदिन योगासने ही गुरुपूजनातली सुगंधी फुले आहेत. आज ४७ वर्षे झालीत, स्वामीजी इथे आहेत. यापुढेही हा समाधिस्थ योगीराणा असाच इथून मार्गदर्शन करत राहणार आहे. कार्यकर्ते येतील आणि जातील. आपले आयुष्य, स्वामीजींना अर्पण करून त्यांच्याच चरणी विलीन होतील. नवीन पिढ्या येतील काळानुरूप स्वीकार्याच्या प्रचार व प्रसाराचे स्वरूप बदलेल, पण गुरुनिष्ठा तशीच राहील. हा समाधिरूपी दीपस्तंभ असाच कायम राहील. इथून आपले, समाधिस्थ स्वामीजी सगळ्यांना कायम मार्गदर्शन करत राहतील''.

याला तुम्ही आमचा वेडेपणा म्हणा, अंधश्रद्धा म्हणा की आणखी काही म्हणा. पण या समाधीवर आमची प्रचंड श्रद्धा आहे. या आश्रमात स्वामीजींचे अधिराज्य आहे- त्यांच्या इच्छेशिवाय इथे काहीही घडत नाही. रोज आमच्या पायांना या समाधिस्थ योगीराजाच्या दर्शनाची माहेरओढ लागते. त्यांच्या समोर नतमस्तक झाल्याशिवाय दिवस सुरू होत नाही.

आपले कर्ते करविते हे समाधिस्थ स्वामीजी आहेत, आपण केवळ त्यांच्या इच्छेनुसार नाचणारी बाहुली आहोत, सगळ्या दोऱ्या त्यांच्या हातात आहेत ही भावना एकदा मनात दृढ झाली नं, की सगळं खूप सोपं होऊन जातं बघा. मग आपल्या तथाकथित सेवेचा गुरूकार्याचा गर्वही होत नाही आणि काही अपरिहार्य कारणांमुळे गुरुकार्यात सहभागी होता आलं नाही तर त्याची खंतही वाटत नाही. स्वामीजीची इच्छा असं म्हणून मोकळं होता येतं. 'मी करतो', 'मीच मोठा कार्यकर्ता' ही भावना गडबड करते.

अनेकदा शारीरिक त्रास, एखादे व्यंग, वेदना यांनी येणाऱ्या मर्यादांमुळे मन खंतावते, न्यूनगंड निर्माण होतो. आता या स्वामीकार्यातून मुक्त व्हावं असा विचार करून स्वामीजींच्या समाधीसमोर उभे राहिलो की मनात येतं, त्या भगवान श्रीकृष्णांचे सवंगडी तरी कुठे सगळे धड होते? कोणी लंगडा, कोणी बोबडा, कोणी तोतरा तर कोणी पेंद्या.

पण भगवंतांना हे सगळे सारखेच प्रिय होते की नाही? 'संगे गोपाळाचा मेळा' घेऊन 'विठु माझा लेकुरवाळा' झालाच की नाही? कृष्ण सख्यावर नाराज होऊन तो बोबड्या 'किस्ना थमाल रे आपुल्या आयी, आम्ही घरासी जातो भाई' असे दहा वेळा म्हणाला असेल, पण शेवटपर्यंत ना कृष्णाने त्याला सोडले ना तो 'थमाल आपुल्या गायी' म्हणत निघून गेला. स्वामीजींशी इतकी सलगी करावी अशी 'सख्य भक्ती' तर आपल्याला शक्य नाही. आपण त्यांच्या 'वास्य-भक्ती'तच रमावे, समाधीसमोर उभे राहून कधी कधी आत्मनिवेदन करावे. 'स्वामीजी, तुम्ही आजकाल आमच्याकडे लक्ष देत नाही' अशी तक्रार या समाधिस्थ योग्याजवळ करावी व आश्रम सेवेला निघून जावं, 'आमचा हिशोब तुमच्या नांवे'.

खरे तर प.पू. स्वामीजींना आम्ही प्रत्यक्ष कधी पाहिलं नाही. आश्रमातली ही समाधी व तिथला समाधिस्थ योगीराणा हेच आमचं 'स्वामीदर्शन'. आमच्यासारखे असे अनेक आहेत. ज्या व्यक्तीला कधी पाहिलं नाही, ऐकलं नाही, ओळखही कधी झाली नाही, तिच्याबद्दल इतकी श्रद्धा, इतकी आपुलकी का व कधी निर्माण झाली असेल? गुलाबराव महाराज फार छान सांगतात की ज्या क्षणी आपली सद्गुरूंशी नजरानजर होते, त्याच क्षणी ते त्यांच्या हृदयात आपल्यासाठी जागा निर्माण करून ठेवतात. नसेल पाहिलं आम्ही प्रत्यक्षात स्वामीजींना पण त्यांनी आम्हाला पाहिलं नसेल कशावरून? 'पाहिले न मी तुला, पण तू पाहिले' असे झाले असेल कदाचित. म्हणून तर त्यांनी या समाधीकडे आकर्षित करून घेतलं असेल. इथे हा समाधिस्थ योगी रोज आम्हाला भेटतो, आमच्याकडे बघतो, हितगूजही करतो. या समाधीमधे अशी कोणती जादू आहे, कोणती शक्ती आहे, कोणास ठाऊक. 'बहुनि मे व्यतीतानि जन्मानि तवचार्जुन' हेच खरे. यंदा दिवाळी अंकासाठी मुलाखत घेताना नेमका हाच प्रश्न आदरणीय गुरुजींना विचारला होता की स्वामीजींच्या या आश्रमात नेमकं असं काय आहे, की ज्यामुळे कुठलंही प्रलोभन नसताना सगळे इकडे आकर्षित होतात? अगदी निष्ठेने, भक्तिभावाने स्वामीकार्याला स्वतःला वाहून घेतात? सगळी कामे करतात? तेव्हा गुरुजी म्हणाले होते, की खरोखर हे एक आश्चर्य आहे. मुळात ही एका संन्याशाची जागा आहे. अगदी विशुद्ध संन्यासी होते स्वामीजी, मी सुद्धा स्वामीजींना फार कमी पाहिलं आहे. आपण सगळेच जे इथे आहोत त्यांच्यात स्वामीजींशी प्रत्यक्ष खूप काही संवाद झाला आहे असे कोणीही नाही. शेवटच्या दिवसांत तर ते आजारीच होते. तेव्हा त्यांनी कोणाला योग वगैरे शिकवण्याचा प्रश्नच नव्हता. पण स्वामीजी हे व्यक्तिमत्त्वच विलक्षण आहे. मूर्तिमंत वैराग्य, मूर्तिमंत कार्य, मूर्तिमंत सेवाभाव म्हणजे प.पू. जनार्दनस्वामी महाराज. त्यामुळे स्वामींच्या कार्यात जो येतो तो आपोआप आकार्षित होतो, एखाद्या चुंबकासारखा!

प.पू. स्वामीजींचे वर्णन गुरुजींकडून ऐकताना गीतेतला तो स्थितप्रज्ञाचा अध्याय आठवला. यात अर्जुन भगवंतांना विचारतो आहे, की देवा, स्थिरबुद्धी, स्थितप्रज्ञाचं लक्षण काय? तो कसा ओळखायचा? हा चालतो कसा, बोलतो कसा आणि बसतो तरी कसा? ''देवा स्थितप्रज्ञ तो कोण। आणि तो कैसा ओळखावा?।।'' या प्रश्नाच्या उत्तरात भगवंत

स्थितप्रज्ञाची सगळी लक्षणे सांगतात.

''काम सर्वथा जाउन। ज्याचे आत्मसंतुष्ट राहते मन।
तोच पुरूष स्थितप्रज्ञ। अर्जुना जाण।।'' सुबोध ज्ञानेश्वरी २ः२९३

या पुढे सांगितलेली लक्षणे म्हणजे-सुखदुःखामुळे आनंद वा उद्वेग नसणे, मनात काम, क्रोध व भय नसलेला, भेदरहित, सर्वांसाठी समभाव असलेला, हर्षशोक रहित, आत्मबोधाने भारित असलेला, भूतमात्री सदय असलेला, रसनेचा संयम असलेला आत्मनिष्ठ हा स्थितप्रज्ञ समजावा.

''अर्जुना ज्याच्या चिता। अखंड आहे प्रसन्नता।
तेथे संसार, दुःखा समस्ता। वाव नाही।।'' सुबोध ज्ञानेश्वरी २ः३३८

स्थितप्रज्ञाची ही सगळी लक्षणे या समाधिस्थ योग्याच्या चरित्रात आढळतात. प्रज्ञाभारती वर्णेकर यांची सिद्ध केलेले 'योगमूर्ति' हे प.पू. जनार्दनस्वामींचे जीवन- चरित्र वाचले की त्यात स्थितप्रज्ञाची सगळी लक्षणे दृग्गोचर होतात, दिसायला लागतात. लक्षात येतं की आमच्यासाठी स्थितप्रज्ञ प्रियभक्त, गुणातीत, पुरुषोत्तम या सगळ्याचं एकच संक्षिप्त उत्तर आहे, 'प.पू. परिव्राजकाचार्य, परमहंस गुरूमूर्ती जनार्दनस्वामी महाराज!' अशा महान योग्याच्या पवित्र समाधीच्या परिसरात आपण रोज वावरतो, या समाधिस्थ योग्याच्या साक्षीने यथाशक्ति योगाभ्यास करतो, या कल्पनेने आम्ही रोमांचित होतो, त्यांच्या समाधीला त्रिवार वंदन करतो. नसेल पाहिलं स्वामीजींना प्रत्यक्षात, पण आता आश्रमाच्या मंगल, परम-पवित्र वातावरणात त्यांचे अस्तित्व जाणवते आहे नं? त्यांच्या कृपेच्या पंखाखाली जीवनदान मिळतंय नं? स्वामीजी त्यांच्या कार्यात आपल्याला सहभागी करून घेतायत नं? हेच खूप झालं, इथेच तर आहेत स्वामीजी आपले.

परवा स्वामीजींच्या समाधीसमोर बसलो असताना मनात त्यांचेच विचार सुरू होते. अचानक नुकताच वाचलेला एक श्लोक आठवला. 'रघुवंशम्' मधे महाकवी कालिदासांनी महाराज दशरथ यांचे वर्णन करताना त्यांच्यासाठी 'समाधिजितेन्द्रिय' असे विशेषण घेतले आहे. 'समाधिजितेन्द्रिय' म्हणजे शास्त्रशुद्ध रीतीने इन्द्रियांवर विजय मिळवलेले. पाच ज्ञानेन्द्रिये आणि पाच कर्मेन्द्रिये यांना जे मनाच्या लगामाने रथाप्रमाणे आपल्या इच्छेने नियंत्रित करतात ते महाराज दशरथ. (रघुवंशम् सर्ग ९ श्लोक १. भाष्य-प्रा. स्वानंद पुण्ड शास्त्री) प.पू. स्वामीजींचे चरित्र वाचले, त्यांची तपस्या, त्यांनी अवलम्बिलेली व्रते आठवली की स्तिमित होतो, स्वामीजी सुद्धा प्रयत्नपूर्वक कठोर तपश्चर्येने 'दशरथ' झाले आहेत हे लक्षात येते.

स्वामीजींबद्दल बोलताना गोळवलकर गुरुजी म्हणतात, ''अतिपरिचयात् अवज्ञा' या सुभाषिताला अपवाद फार थोडे आढळतात. श्री. जनार्दनस्वामी या अपवादात्मक दुर्लभ सत्पुरुषांच्या कोटीतले आहेत. अतिपरिचयामुळेच माझ्या मनात त्यांच्या विषयी आदर निर्माण झाला आहे.''

आपण स्वामीजींचा जितका परिचय करून घेऊ तितके ते उलगडत जातात, आपले होतात. यासाठी स्वामीजींचे ग्रंथ, त्यांचे चरित्र सतत वाचले पाहिजेत. त्यावर चिंतन, मनन झाले पाहिजे. स्वामीकार्यासाठी 'नित्य अभियुक्त' असले पाहिजे.

आज मात्र आम्ही या समाधिस्थ योगीराजासमोर उभे असताना अत्यंत भावविभोर झालो आहोत. त्यांना एकच मागणे मागतो आहोत,

''एकवार पंखावरूनी फिरो तुझा हात। शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात।।''

''आम्हाला आमचं शेवटचं घरटं तुमच्या अंगणात बांधायचं आहे. स्वामीजी, अंतिम पाऊल तुमच्या अंगणात टाकायचं आहे. त्यासाठी आम्हाला प्रेरणा व शक्ती द्या''.

❊ ❊ ❊

दीपावली अंक : २०२५ जाहिरात शोधा, रोख मिळवा

'योगप्रकाशच्या' दिवाळी विशेषांक, २०२५, मधील पृ.क्र. ३४५ वर, आवेदन पत्र पाठविण्यासाठी अंतिम तारीख ३०/११/२०२५ अशी देण्यात आली होती, परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे नागपूर येथील अंकांचे प्रेषण उशिरा करण्यात आले (नोव्हेंबर अखेरीस) त्यामुळे ह्या स्पर्धेची आवेदनपत्र पाठविण्याची सुधारित अंतिम तारीख **३१ जानेवारी २०२६** अशी करण्यात येत आहे याची कृपया नोंद घेण्यात यावी.



हठप्रदीपिका द्वितीयोपदेश

शुद्धिक्रिया

श्री आनंदानुज
हिंदी अनुवाद - रमेश मुलतानी

नाड़ीशोधन नामक 'प्राणायाम' के विषय पर सितंबर २०२५ के अंक में जानकारी दी गई थी। इस अंक में षट्कर्म अर्थात 'शुद्धिक्रिया' इनके बारे में हठप्रदीपिका में दिये गये श्लोक अर्थसहित देने का प्रारंभ कर रहें हैं।

मेदःश्लेष्माधिकः पूर्व षट्कर्माणि समाचरेत्।
अन्यस्तु नाचरेत्तानि दोषाणां समभावतः।।२१।।

अर्थः- मेद या कफ इसकी प्रबलता वाले लोगोंने प्रथम छह शुद्धिक्रियाओंका अभ्यास करना चाहिए। किंतु जिसके त्रिदोष समस्थिति में है, उनको इसका प्रयोग करनेकी आवश्यकता नहीं हैं।

टीकाः- प्राणायाम का अभ्यास प्रारंभ करनेपूर्व शरीर शुद्धि के लिए जो छह क्रिया बतलाई गई है, उनका अभ्यास करना उचित है। अर्थात् जिनके त्रिदोष समस्थिति में रहते हैं, उनको यह शुद्धिक्रियाएं करना आवश्यक नहीं है, ऐसा स्वामी स्वात्माराम जी इस श्लोक के द्वारा कह रहें हैं। आज के समय में कफ, वात एवं पित्त इनकी समस्थिति होनेवाले लोग विरल है। इसलिए वर्तमान काल में अपवाद रूप से कुछ लोगों को छोड़कर बहुधा सभी को आसन, प्राणायाम आदि का अभ्यास शुरू करनेपूर्व ये सभी छह शरीर शुद्धिक्रियाएं करना हितकारी है।

धौतिर्बस्तिस्तथानेति स्त्राटकं नौलिकं तथा।
कपालभातिश्चैतानि षट्कर्माणि प्रचक्षते।।२२।।

अर्थः- धौति, बस्ति और नेति तथा त्राटक नौलि व कपालभाति ये छह शुद्धिक्रियाएं है ऐसा कहते है।

कर्मषट्कमिदं गोप्यं घटशोधनकारकम्।
विचित्रगुणसंधायि पूज्यते योगिपुङ्गवैः।।२३।।

अर्थः- जिन के बारे में गोपनीयता बरतनी चाहिए ऐसी ये छह शुद्धिक्रियाएं संपूर्ण शरीर की शुद्धि करती

धौति, बस्ति और नेति तथा त्राटक, नौलि व कपालभाति ये छह शुद्धिक्रियाएं है। आज के समय में कफ, वात एवं पित्त इनकी समस्थिति होनेवाले लोग विरल है। इसलिए वर्तमान काल में अपवाद रुप में कुछ लोगों को छोड़कर बहुधा सभी को आसन प्राणायाम आदि का अभ्यास शुरु करने पूर्व ये सभी छह शरीर शुद्धिक्रियाएं करना हितकारी है।

है। अकल्पित एवं चमत्कारिक फल देनेवाली ये शुद्धिक्रियाएं योगीयोंके दृष्टि से पूजनीय है।

अथ धौतिः

चतुरङ्गुलविस्तारं हस्तपंचदशायतम्।
गुरूपदिष्टमार्गेण सिक्तं वस्त्रं शनैर्ग्रसेत्।
पुनः प्रत्याहरेच्चैतदुदितं धौतिकर्म तत्।।२४।।

अर्थः- चार अंगुल चौडा एवं पंधरा हाथ लंबा, गीला कपड़ा गुरुने उपदेश किये हुए पद्धतिसे धीरे-से निगलकर पुनः बाहर निकालने की क्रिया को धौति कहते हैं।

टीकाः- पचन संस्थामें जठरका का प्रारंभिक भाग व फेफड़ें और हृदय इनमें निहित मल का निष्कासन धौति इस शुद्धिक्रिया से साध्य होता है।

कासश्वासप्लीहकुष्टं कफरोगाश्च विंशतिः
धौतिकर्मप्रभावेन प्रयान्त्येव न संशयः।।२५।।

अर्थः- धौति क्रिया करने से दमा, श्वासविकार, प्लीहा के रोग, कोढ़ एवं अन्य त्वचा विकार और बीस प्रकार के कफ विकार पूर्णतया नष्ट होते है, इसमें तिलमात्र भी संदेह नहीं हैं।

अथगजकरणी

उदरगतपदार्थमुद्वमन्ति पवनमपानमुदीर्य कण्ठनाले।
क्रमपरिचयवश्यनाडिचक्रा गजकरणीति निगद्यते हठज्ञैः।।२६।।

अर्थः- नाड़िचक्र के क्रमोंकी जानकारी अथवा जानने की शक्ति एवं उसपर नियंत्रण साध्यकर अपान वायु को ऊर्ध्वगति देकर पेट में निहित पदार्थ कंठ तक लाकर, अंत में वमन करके बाहर निकालने की क्रिया को गजकरणी इस नाम से हठयोग के सुविद्य संबोधित करते हैं।

टीकाः- गजकरणी नामक स्वतंत्र शुद्धिक्रिया षटकर्मोंमे बतलाई नहीं है। धौति का ही एक प्रकार मानकर यहाँ इस गजकरणी क्रिया का वर्णन किया गया होगा। धौतिक्रिया में वस्त्र पेट में निगलकर वह पुनः बाहर निकाला जाता है। उसे बाहर निकालने के लिए वस्त्र का अंतिम छोर बाहर ही रखना होता है। किंतु पेट में अनावश्यक या हानिकारक अन्नपदार्थ गये है तो उन्हें बाहर निकालने के लिए पेट में निहित नैसर्गिक ऐसे अथोगतिको ऊर्ध्वगामी दिशा देनेकी मानसिक शक्तिसे साध्य होनेवाली गजकरणी क्रिया को प्रगत धौति कहने में आपत्ति नहीं है।

अथ बस्तिः

नाभिदहघ्नजले पायुन्यस्तनालोत्कटासनः।
आधाराकुंचनं कुर्यात् क्षालनं बस्तिकर्म तत्।।२७।।

अर्थः- नाभीतक आनेवाले (नदी या तालाब के) पानी में उत्कटासन की स्थिति में

खड़े होकर गुदद्वार में नली डालना है (व) गुदद्वार का आंकुचन करके (उसका अंदरसे) धावन/प्रक्षालन करना है। यही बस्तिकर्म है।

गुल्मप्लीहोदरं चापि वातपित्तकफोद्भवाः।
बस्तिकर्मप्रभावेन क्षीयन्ते सकलामयाः।।२८।।

अर्थः- बस्ति क्रिया के द्वारा गुल्म, प्लीहा व पेट (इनमें हुए विकारों के कारण) और वात, पित्त, कफ (इनकी समस्थिति न होना) के कारण निर्माण हुए सभीप्रकार के रोग (खट्टापन) कम होते है।

धात्विन्द्रियान्तःकरणप्रसादं दद्याच्च कान्तिं दहनप्रदीप्तिम्।
अशेषदोषोपचयं निहन्यादभ्यस्यमानं जलबस्तिकर्म।।२९।।

अर्थः- जलबस्ति के द्वारा धातु व इंद्रियोंकी कार्यक्षमता बढ़कर अन्तकरण की (मन की) प्रसन्नता बढ़ती है। शरीर कांतिमय बनता है। जठराग्नि प्रज्वलित होती है। अपचन आदि पेट के सभी दोष नष्ट होते है। ऐसा यह जलबस्ति कर्म है।

बस्तिनामक शुद्धिक्रियासे मलाशय, गुदद्वार एवं बड़ी आंत का अंतिम भाग इनकी शुद्धता साध्य होती है। 'नेति' इस तीसरी शुद्धिक्रियासे नासिकामार्ग, गला कंठ, आंखें, मस्तिष्क आदि अवयवोंकी शुद्धि होती है। 'त्राटक' यह शुद्धिक्रिया आंखें और मन इनके शुद्धि के लिए उपयोगी है। 'नौलि' से छोटी आंत और बड़ी आंत का संपूर्ण मार्ग शुद्ध होकर उसकी कार्यक्षमता बढ़ती है। 'कपालभाति' से सभी प्रकार के कफदोष नष्ट होते है। सब मिलाकर संपूर्ण शरीर निर्मल होकर अत्यंत कार्यक्षम करने के लिए षटकर्म उपयोगी है।

(क्रमशः)

दीर्घकालीन वर्गणीदार यादी

'योगप्रकाश' मासिकाला वाचकांनी भरघोस प्रतिसाद देऊन आपल्या पसंतीची पावती दिलेली आहे. ह्या महिन्यात **दीर्घकालीन सदस्य** झालेल्यांची सूची खाली दिली आहे.

नागपूर
राजन पसटकर
पंढरीनाथ राजाराम तांबटकर
सौ. शिवानी दाणी वखरे
सी.व्ही. तुरकर
डॉ. शैलेश नारायणराव खेकाळे
रामकृष्ण संतोषराव वाघ
वीरेंद्र बोण्डे

नागपूर
शिवाजी शेषराव बारस्कर
हितेश गणेश बोडखे
शशी त्रिपाठी
ॲड. रोहन जोशी

उमरेड
सतीश गुप्ता

पुणे
संध्या किशोर पडोळे

परभणी
मंजुषा जामगे

नाशिक
रवींद्र धर्मा पाटील
एकनाथ महादू भोपे
गोविंद प्रभाकर केंगे
किरण गोपाळ दीक्षित

अमरावती
तिलक मोतीरामजी खेडकर
जनार्दन भीमरावजी वाघ

लेखमाला

वेदांमधील योगमीमांसा

लेख ५ : योगाची व्याख्या

(सप्टेंबर महिन्यातील लेखाचा पुढील भाग)

ॐ

डॉ. योगेश वाईकर
(मूळ इंग्रजी लेख)
अनुवाद :
डॉ. अनिरुद्ध गुर्जलवार

योग ही स्वतःला उच्च भूमिवर आरुढ करण्याची क्रिया होय. म्हणूनच योग आणि तंत्र हे दोन्ही शास्त्र हातात हात घालून मिरवतांना आपणास पुढे आढळून येते. काही क्रियांचा सविस्तर उहापोह योगात आढळतो, तर काहींचा तंत्रात आढळतो. आणि नेमक्या ह्याच गोष्टींना यज्ञ संस्थेमधे कर्मकांड किंवा अनुष्ठान म्हणून वर्णिले आहे.

सोमानंद यांची व्याख्या जरा निराळी आहे. ते म्हणतात, 'योग म्हणजे- जीव हाच सर्वोच्च ब्रह्म ह्या सत्याचे सातत्याने, निरंतर अनुसंधान करणे, क्षणभरासाठी देखील ह्या सत्याचा विसर न पडू देणे. शिवसृष्टी ह्या ग्रंथात सोमानंद ह्या सृष्टीतील प्रत्येक भासमान गोष्टींच्या मागे चैतन्य हेच एकमेव तत्त्व आहे असे प्रतिपादन करतात. वाक् हेच ब्रह्म, प्राण हेच ब्रह्म, मानस हेच ब्रह्म, एकंदरीत ब्रह्म हेच जाणीवेच्या उच्च स्तरावरील अंतिम सत्य असे त्यांचे म्हणणे आहे. आपल्या सर्व कार्यकलापाचे उद्दिष्ट हे ब्रह्मप्राप्तीसाठी झटणे, त्याच्याशी एकरूप होणे, व अंततोगत्वा ह्या तत्त्वाला स्वतःद्वारे प्रदर्शित करणे असेच होय, असे त्यांचे मत आहे.

शारदातिलक तंत्रामधे लक्ष्मणगुप्त देखील थोड्याफार फरकाने हेच सांगतात. योग म्हणजे जीव ब्रह्म ऐक्याचा अनुभव होणे असे त्यांचे मत. जीव हे सर्वोच्च तत्त्व, जे ब्रह्म म्हणून ओळखल्या जाते, त्याच्याहून भिन्न नाही असा बोध होणे हाच योग होय. शिव आणि शक्तिची अनुभूती म्हणजे योग. सार्वभौम चेतनेचे ज्ञान म्हणजे योग. (शारदातिलक तंत्र, २५.१-३ ब)

रामकंठांनी योग या संज्ञेचा निष्कर्ष काढताना 'योग म्हणजे युज धातूच्या मुळापासून निघालेला शब्द' असे सांगताना त्याला अकर्मक क्रिया म्हणतात. (संस्कृत व्याकरणातील अकर्मक शब्दांना कर्माची आवश्यकता नसते). म्हणजे 'योग' चा अर्थ 'कर्मयोगातून समाधी' असे ते करतात. त्यांच्यामते 'ज्ञान' व 'कर्म' दोन्ही एकच आहेत.

काश्मिरी शैव तत्त्वज्ञानाचे मुकुटमणी आचार्य अभिनव गुप्त 'योग म्हणजे एकत्व' असे प्रतिपादन करतात. त्यांचे मत 'मालिनी विजयोत्तर' तंत्राहून जरा निराळे आहे. त्यांच्या मते तुरीयावस्थेतील सर्वोच्च बोधाची अवस्था प्राप्त करण्याची शिडी म्हणजे योग. सर्वोच्च मार्गाला जाण्यायेण्याचा मार्ग म्हणजे योग. योग म्हणजे सर्वोच्च अवस्था नव्हे.

योग ही शरीर-मन युग्माच्या विविध पातळ्या व सरतेशेवटी सर्वोच्च स्तरावरील चेतनेचा साक्षात्कार करण्याची साधना होय. माझ्या मतानुसार योग म्हणजे अत्युच्च चेतनेचा विविध व्याहृतीमधील आविष्कार! ती एक प्रक्रिया असते. श्रीतंत्रलोकात अभिनवगुप्त मनाच्या सर्व बाह्य तत्त्वांच्या विलयाला योग म्हणतात. परंतु हे ह्या प्रक्रियेचा एक भाग आहे, नव्हे तो चेतनेच्या आरोहणाचा एक भाग होय. किंबहुना कुंडलिनी जागृतीच्या प्रक्रियेचा तो एक भाग आहे. एवढे होणे हे फक्त अर्धी पक्रिया आहे. ती मुक्तीच्या दिशेने होणारा प्रवास दर्शविते. (निर्गुणात्मक मुक्ती). परंतु योग पुढची प्रक्रिया देखील साधण्यास कटिबद्ध असतो आणि ही प्रक्रिया म्हणजे चेतनेचे अवरोहण (Descent). म्हणजे निर्गुणात्मक अवस्थेतून सगुणात्मक अवस्थेकडे होणारा प्रवास, जी की एक अवतरणाची प्रक्रिया होय. आणि खालील स्तरावरील सगुणात्मक अवस्थेकडे होणारा प्रवासच योगाचे अंतिम उद्दिष्ट पूर्ण करतो. एकंदरीत योग म्हणजे निम्न स्तरांवरून उच्च स्तरावर, आणि पुन्हा उच्चतेकडून निम्नतेकडे वाहणाऱ्या चेतनेच्या प्रवाहाला संचालित करतो व जीवन परिपूर्ण करतो.

हठयोगातून योगसाधनेची होणारी सुरुवात ही एकदम सरल असते. राजयोगात ह्या साधनेचा विकास होण्यास प्रारंभ होतो, आणि पुढे अधिकाधिक ही साधना उत्क्रांत होत जाते. ह्या साधनेदरम्यान सचेतन आत्म्यासोबत अंतरंगाची अन्योन्यक्रिया होत असते. वैदिक ब्राह्मण भागात ह्याच क्रियांचा उहापोह आढळतो. अशा अंतरंग परस्परालंबी क्रियांची योग्य दखल घेऊन त्यांचे एकत्रीकरण हे वैदिक संहितांमधे आढळते. ह्यांचेच होणारे नैसर्गिक परिणाम तंत्रशास्त्रात उपयोगात आलेले आपल्याला दिसून येते. खरे पाहिले तर ह्या सर्व अंतरंग क्रियांचा उचित विकास आपल्याला तंत्रमार्गात मिळतो. त्याचे परिणाम वाक, प्राण व मानसावर कसे कसे होतात म्हणजेच निम्न स्तर, मध्यम आणि शेवटी उच्चस्तरावर होणाऱ्या ह्या प्रक्रियांचा अर्थ तंत्रात अनुभवाला येतो.

योग ही स्वतःला उच्च भूमिवर आरुढ करण्याची क्रिया होय. म्हणूनच योग आणि तंत्र हे दोन्ही शास्त्र हातात हात घालून मिरवतांना आपणास पुढे आढळून येते. काही क्रियांचा सविस्तर उहापोह योगात आढळतो, तर काहींचा तंत्रात आढळतो. आणि नेमक्या ह्याच गोष्टींना यज्ञ संस्थेमधे कर्मकांड किंवा अनुष्ठान म्हणून वर्णिले आहे.

(क्रमशः)

लेखक : **डॉ. योगेश वाईकर**, बालकांचे पचन व यकृत संस्था विशेषज्ञ

pedgihep@yahoo.com

यत्र साधको योगस्य यत्र स्वामी जनार्दनः

(दिवाळी अंकासाठी प्रस्तुत झालेला लेख)

ॐ

सतीश एलकुंचवार

पतंजली महामुनीचे 'योगदर्शन' हे भारतीय सहा दर्शन शास्त्रातील प्रवृत्ती व निवृत्ती मार्ग दाखविणारे दर्शन शास्त्र आहे. हाच 'अष्टांग योग' स्वामीजींनी फारच सोप्या पद्धतीने आपल्याला अनेक लेखांमधून समजावून सांगितला आहे. त्यात आसने व प्राणायाम ह्या विषयांवरील पुस्तके ही अष्टांग योगातील २ महत्त्वाच्या- अंगांवर असून त्यातील सूचना व दिग्दर्शन हे इतरत्र कुठेही दिसत नाही. उदाहरणार्थ कोणते आसन कितीवेळ करावे, कसे करावे, त्याचे लाभ, विद्यार्थी व शिक्षकांना अत्यंत मौलिक, विस्तृत सूचना, शास्त्रशुद्ध प्राणायाम कसा करावा ह्याचे दिग्दर्शन एकमेवाद्वितीय आहे.

यत्र साधको योगस्य यत्र स्वामी जनार्दनः। समाधि सौख्यं तत्रैव आरोग्यं वर्तते सदा।। (श्रीनिवास वर्णेकर) 'जेथे साधक आहे आणि जनार्दनस्वामी (उपस्थित) आहेत तेथे जणू समाधि अवस्थेत प्राप्त होणारे सुख तसेच (सर्व प्रकारचे) आरोग्य विलसत असते.'

अलीकडच्या काळातील अत्यंत थोर योगी, परमपूज्य परिव्राजकाचार्य सद्‌गुरू श्री जनार्दनस्वामींनी निर्माण केलेल्या साहित्यातून योग विषयक जे विचार त्यांनी प्रसृत केले आहेत ते सहजरीत्या समजू शकतील आणि आचरता येतील असे म्हणता येते. योगशास्त्र हे गूढ शास्त्र आहे आणि कोट्यवधीतून एखादीच व्यक्ती पतंजली मुनींनी दर्शविलेल्या अंतिम टप्प्यापर्यंत म्हणजे 'निर्विकल्प समाधी स्थिती' पर्यंत जाऊ शकत असेल पण स्वामीजींनी हे गूढ शास्त्र स्त्री-पुरुषांसहित सर्वांना समजेल अशा पद्धतीने - समाजमानसात रुजवले. स्वामीजींचा हा 'अमृतवर्षाव' आहे. तो आम्ही किती घेऊ शकतो हे आमच्यावर अवलंबून आहे.

स्वामीजींनी स्वातंत्र्यपूर्व काळातच अचूकपणे जाणले होते की पुढे चलून 'यांत्रिक उन्नती मुळे भौतिक सुखप्राप्तीसाठी व्यक्ती-धडपडतील, ईश्वरावर, धर्मावर, शास्त्रांवर लोकांचा विश्वास डळमळीत होईल'. त्यामुळे समाजात पारंपरिक योग रुजविणे आवश्यक आहे. अनामिक योग गुरूंकडून त्यांना आदेशही हाच मिळाला होता की, समाजात योगप्रसार करावा. व्यक्ती व समाजात वेळीच योगविद्येचा प्रसार करून, त्याला सांघिकतेचे स्वरूप देऊन, समाज- सत्प्रवृत्त करून तद्‌नुषंगाने राष्ट्र बांधणी व्हावी हे स्वामीजींच्या योगसाहित्यातून दिसून येते. स्वामीजी स्वतः कसे होते हा आपला विषय नसला तरी त्यांनी स्वतःच्या तपःपूत,

संन्यस्त आचरणातून प्रत्यक्षात योगसाधक कसा असावा याचे उदाहरण सर्वांसमोर ठेवले. सर्वसामान्य जनतेसाठी ७५ वर्षांपूर्वी स्वामीजींनी प्रथमतः आसन व प्राणायामाचे वर्ग सुरू केले व त्याचा विस्तार कसा व किती भव्य झाला आहे हे आपण अनुभवित आहोत आणि त्यावर लिखाणही भरपूर झाले आहे. **परंतु स्वामीजींना 'अभिप्रेत योगदर्शन' हा काय विषय आहे हे समजून घेणे आवश्यक आहे** कारण आपण मंडळ आणि इतर केन्द्रांत फक्त काही आसने व अगदी वरवरचा, कधीकधी आणि तोही अत्यंत थोड्या अवधीसाठी होणारा प्राणायाम करून तात्कालिक शारीरिक लाभ मिळवून त्यातच धन्यता मानली तर श्री स्वामींना अभिप्रेत/अपेक्षित योगाच्या आपण दूर आहोत. काहीच न करण्यापेक्षा काही आसने करणे हे योग्यच पण स्वामीजींचे आचरणात्मक योगा बद्दलचे विचार व त्या अनुषंगाने आपली स्वतःची, समाजाची उन्नती करावी हा दिवाळी विशेषांकाचा विषय आहे.

दर्शन शास्त्र म्हणजे Philosophy - तत्त्वज्ञान, अशी सोप्यात सोपी व्याख्या आपण करू शकतो. पतंजली महामुनीचे 'योगदर्शन' हे भारतीय सहा दर्शन शास्त्रातील प्रवृत्ती व निवृत्ती मार्ग दाखविणारे दर्शन शास्त्र आहे. हाच 'अष्टांग योग' स्वामीजींनी फारच सोप्या पद्धतीने आपल्याला अनेक लेखांमधून समजावून सांगितला आहे. त्यात आसने व प्राणायाम ह्या विषयांवरील पुस्तके ही अष्टांग योगातील २ महत्त्वाच्या-अंगांवर असून त्यातील सूचना व दिग्दर्शन हे इतरत्र कुठेही दिसत नाही. उदाहरणार्थ कोणते आसन कितीवेळ करावे, कसे करावे, त्याचे लाभ, विद्यार्थी व शिक्षकांना अत्यंत मौलिक, विस्तृत सूचना, शास्त्रशुद्ध प्राणायाम कसा करावा ह्याचे दिग्दर्शन एकमेवाद्वितीय आहे. ही पुस्तके त्यांनी पन्नासच्या दशकात लिहिली आहेत हे विशेष. परंतु स्वामीजींच्या 'योगस्वरूप' ह्या ग्रंथामधील ज्या सूचना आहेत, दिशादर्शन आहे, त्याप्रमाणे साधना करीत राहणे हे स्वामीजींना अपेक्षित राहील, कारण योगाचे स्वरुप काय हे स्वामीजींनी त्यात आपल्याला समजेल असे व आचरणात्मक - केवळ तात्त्विक नव्हे- बाजू काय आहे हे फार सुलभ रीतीने समजावले आहे.

पायरी पायरीने स्वामीजी वाचकाला-साधकाला अंतःकरण शुद्धीकडे घेऊन जातात. सुरुवातीलाच स्वामीजींनी सांख्य-वेदान्त-योगशास्त्रातील पायाभूत सिद्धान्त म्हणजे 'कर्मफल सिद्धान्त' सांगून प्रारब्धानुरूपचे क्लेश असतात ते भोगावे लागतात पण ह्या जन्मातील बरी वाईट कर्मे स्वनिर्मित असतात हे महत्त्वाचे जीवन सत्य सांगून ठेवले आहे. अंतःकरण अशुद्ध का असते हे स्वामीजींनी त्रिगुणांवर विस्तृत विवेचन करून समजावले आहे. इथेच साधकाला जाणवत राहते की आत्मनिरीक्षण आवश्यक आहे. ह्या सर्व मानसिक क्रिया आहेत. 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' ह्या योगाच्या व्याखेतच चित्तवृत्तींचा पूर्णतः निरोध म्हणजे योग असे भगवान पतंजली म्हणतात. म्हणजेच ढोबळ मानाने मनुष्याचे मन (मन, बुद्धी चित्त हे अंतःकरणाचेच भाग मानल्या गेले आहेत) हे

योगसाधनेतील मुख्य अडथळा पण त्याचबरोबर योगसाधनेचे प्रमुख इंद्रिय आहे हे लक्षात घेतले पाहिजे. (शास्त्रात ५ कर्मेंद्रिये + ५ ज्ञानेंद्रिये + मन अशी ११ इंद्रिये असतात असा सिद्धान्त आहे) स्वामीजी म्हणतात की अविद्या अनादी आहे- व ती अस्मिता (अहंकार) राग (आसक्ती), द्वेष व अभिनिवेश (मृत्युभय) यांची जननी आहे. वाचकांना आठवत असेल की योगप्रकाशमधील 'सर्वव्यापी त्रिगुण' ह्या लेखात उल्लेख केल्यानुसार जीवातील अहंकाराच्या स्फुरणामुळे व प्रकृतिच्या आसक्ती मुळे आताची दृष्य सृष्टी उत्पन्न झाली. इतकी अविद्या अनादी आहे! मग अंतःकरणातील मन-बुद्धी, चित्त व अहंकार यांची शुद्धी कशी करावी हे स्वामीजींनी अतिशय सुलभ रीतीने सांगितले आहे.

ह्या संदर्भात 'योगस्वरुप'- योगाचे स्वरुप ह्या ग्रंथाचे विशेषत्व ठळकपणे असे लक्षात येते की पातंजल योग दर्शनात १९५ सूत्रे आहेत पण स्वामीजींनी ह्या ग्रंथात फक्त ९-१० सूत्रेच सांगितली आहेत- त्यात योगदर्शनातील प्रथम ४ सूत्रे येणे हे क्रमप्राप्तच होते कारण त्याने पातंजल योग म्हणजे काय हे अधोरेखित होते. त्यांनंतरची ४-५ सूत्रे जी दिली आहेत ती आचरणात्मक आहे. उदाहरणार्थ १) योगसाधनेतील अडथळे (सूत्र क्र १/३०) म्हणजे मानसिक व शारीरिक व्याधी, मनाची अकर्मण्यता, साधनेबद्दल संशय, आळस, भोगवादाचा अतिरेक, साधना बस्स झाली ही भ्रान्त इत्यादी सांगितली म्हणजेच त्यापासून सावध असावे २) साधनकर्म निरंतर व त्या साधनेवर पूर्णश्रद्धा ठेवून करणे (सूत्र क्र १/१४) हे सांगून ३) मन-चित्त प्रसन्न करण्याचे पातंजल सूत्र प्रथम सांगितले (सूत्र क्र. १/३३) ते म्हणजे सुखाशी (आध्यात्मिक सुख, भोगसुख नव्हे) मैत्री, दुःखितांबद्दल करुणाभाव जागृत करणे, अपुण्याची उपेक्षा करणे, स्वतःच्याच नव्हे तर दुसऱ्याच्याही पुण्यकर्माने आनंदित होणे. हे सांगून दुसराही शास्त्रोक्त उपाय सांगितला आहे तो म्हणजे १) एकान्तवास म्हणजेच स्वनिरीक्षण करून मनाचे समत्व साधणे व विशेषे करून ज्याच्याशी आपला संबंध नाही त्याबद्दल विचार न करणे २) आहार कमी करणे. ह्यात आपला नेहमीचा तर आहेच पण शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध ह्यांचा ज्ञानेंद्रियांद्वारे प्राप्त होणारा आहारही संयमित ठेवणे, ३) मौन म्हणजे कमीत कमी बोलणे ४) आशा-अपेक्षा न ठेवणे म्हणजेच आशा किंवा अपेक्षाभंगाचे दुःख न होऊ देणे ५) इंद्रिय निग्रह आणि ६) प्राणायाम.

वरील उपायात, मानसिक किल्मिषे, त्याने होणारे वृत्तींमधील उठाव आणि तरंग नाहीसे करणे, रजो-तम गुण कमी करून सात्विक गुणाचे आधिक्य करणे, हा मानसिक तसेच क्रिया योगाचा भाग आहे हे ओघानेच आले.

पतंजलीमुनींच्या अष्टांग योगाचे प्रणेते व त्या योगातील प्रत्येक सूत्राचे जणू अविष्कार असलेले जनार्दनस्वामी आपल्याला हा योग सोपा करून सांगण्यासाठी शेवटी 'प्राणायाम' ह्या अष्टांग योगाच्या ४ थ्या अंगापर्यंतच आणून सोडतात आणि एकदम योगातील ईश्वरस्वरूप, व थोडक्यातच (१ पानात) पातंजल योगदर्शन सांगून पुस्तक संपवतात. योगस्वरूप हे पुस्तक स्वामीजींनी 'योगप्रकाश' मासिकात लिहलेल्या लेखांचे

संकलन आहे त्यामुळे असा समज होऊ शकतो की प्राणायामानंतरची प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी ह्या विषयांवरील लेख पुस्तकात घेतले नाही. पण पुस्तकाच्या शेवटच्या 'हे लिखाणपूर्ण करतो' ह्या वाक्याने तो भ्रम दूर होतो. पण मग प्राणायाम साध्य झाल्याने (इतर सर्व उपायांसहित) मन प्रसन्न झाल्याने धारणा, ध्यान व समाधी ह्या अंतरंग योगाची साधना सहजतेने होते असे स्वामीजी नमूद करतात. अर्थात् 'प्राणायाम' साध्य होणे म्हणजे काय याचे यथायोग्य विवरण स्वामीजींनी त्यांच्या 'प्राणायाम' ह्या अप्रतिम ग्रंथात अत्यंत विस्ताराने सांगितले आहे. खांडवे गुरुजीही म्हणतात की प्राणायाम साध्य झाला की प्रत्याहार धारणा, ध्यान ह्या दालनांची कुलुपे गळून पडतात.

ह्यामुळे आसनांबरोबर बंधांसहितच्या शास्त्रशुद्ध प्राणायामाचे महत्त्व आपण समजू शकतो. हा असा 'प्राणायाम' स्वामीजींनी मंडळात रुजविला आहे व त्याच प्रकारे तो सर्व केन्द्रांमध्ये शिकविला जातो. तो आम्ही स्वतः पुढे किती नेतो हे आमच्यावर आहे. म्हणूनच स्वामींनी केलेल्या अमृतवर्षावातील किती अमृत आम्ही घेऊ शकतो हा सुरुवातीचा प्रश्न पुन्हा उपस्थित करणे योग्य होईल.

स्वामीजींच्या योग साधनेच्या संकल्पनेत वारंवार उत्पन्न होणारी 'आसक्ती' व ती दूर करणे, त्यावरचे उपाय हा भाग येतो. हा भाग आपल्या दृष्टीने किती महत्त्वाचा आहे हे थोडा जरी विचार केला तरी लक्षात येईल. आपले सर्व व्यवहार हे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध ह्या, पंचमहाभूते ज्यापासून उत्पन्न झाली आहेत, त्या तन्मात्रांच्या प्रगट झालेल्या विविध वस्तुंबद्दलच्या आसक्तीने बहुतांशी होत असतात, हे स्वामीजींनी 'वस्तूबद्दल प्रेम कां ?', 'आसक्ती हे दुःखाचे कारण', ह्या विषयी लिहून दाखवून दिले आहे.

प्रत्यक्ष व्यवहारासाठी माउलींनी 'मित्राची सामान्य लक्षणे' 'सदगुणांविषयी आदर हेच सज्जनतेचे लक्षण' 'सज्जन संगतीचा प्रभाव' 'सांसारिक जबाबदारी टाळून मन प्रसन्न राहणार नाही' 'असफलतेमुळे तमोगुण वाढतो', 'स्वार्थामुळे मित्र दुरावतात' हे विषयही आपल्या योग साहित्यात अंतर्भूत केले आहेत हे विशेष.

स्वामीजींच्या योगसाधनेबद्दलच्या सूचनांचा अभ्यास, चिन्तन व मनन करून त्यांना अपेक्षित असलेला सांघिक, निःशुल्क योगाभ्यास, त्यास पूरक असलेले आध्यात्मिक वातावरण निर्मिती व योग प्रसार हे कार्य स्वामीजी समाधिस्थ झाल्यावर प्रचंड प्रमाणावर खांडवे गुरुजींनी गेल्या ४५ वर्षात उभे केले आहे, हे आपले भाग्य!

रामनगरला, मंडळात स्वामीजी समाधिस्थ झाले. आम्हास त्यांच्या सान्निध्यात तेथे योगाभ्यास करावयास मिळणे हे मागील जन्माचे सुकृतच!

❊ ❊ ❊

योगवार्ता सुवाच्य अक्षरात असावी व 'योगप्रकाश' कार्यालयात महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत द्यावी ही विनंती - संपादक

देणगीदार यादी

योगमूर्ती प.पू. जनार्दनस्वामींचे निःशुल्क योगप्रचाराचे व्रत सेवाभावाने निरंतर चालविणाऱ्या योगाभ्यासी मंडळाला निरपेक्ष देणगी देऊन सहकार्य करणाऱ्या हितचिंतकांचा नामनिर्देश आम्ही कृतज्ञतापूर्वक करीत आहोत. (११/११/२५) पर्यंत

श्रीमती सुधा मुजुमदार (योगसंमेलन देणगी)	१०००/-
श्री. आनंद अरविंद अभ्यंकर (--''--)	२५०००/-
श्री. नंदकिशोर जोशी (--''--)	२५०००/-
श्री. अनिल वि. कुळकर्णी, पुणे (--''--)	१०००/-
श्री. मंदार जोशी, पुणे (--''--)	१०००/-
श्री. अनिल खडक्कार (--''--)	१००००/-
सविता सावनेरकर (साई योगवर्ग, नंदनवन)	३८००/-
श्री. अमोल सुरेश जोशी, पुणे (--''--)	१००१/-
श्री. प्रदीप तामखडे, पुणे (--''--)	२१००/-
श्रीमती अलकाताई जोग (--''--)	५०००/-
श्रीमती सविता भालेराव (--''--)	१००२/-
श्री. भय्या पोटदुखे (--''--)	१००००/-
श्री. राजेश्वर बोंगीरवार, चंद्रपुर (--''--)	४००००/-
श्री. रमेश मुलतानी (--''--)	५०१/-
श्रीमती ज्योती उमाशंकर दवे (--''--)	५००१/-
डॉ. विजया धोटे (--''--)	५०००/-
सौ. नमिता बांगरे (--''--)	५०००/-
श्री. अरुण चौधरी (देणगी)	५००/-
श्री. साकेत आ. हटवार, अमेरिका (गुरुदक्षिणा)	१०१/-
श्री. आत्माराम हटवार (--''--)	१११/-
श्री. रविशंकर तरासे (पादुकापुजन देणगी)	६५७२/-
श्री. राजेश पांडे (योगवर्ग वर्धापन दिन)	१०००/-
सौ. अंजली अनिल टाकसाळे (योगसंमेलन देणगी)	१०००१/-
श्री. अनिल टांकसाळे (देणगी)	१५१/-
श्री. तुषार वानखेडे (निरोगत्ववर्ग गुरुदक्षिणा)	३०००/-
श्री. गजेंद्र सिंग (--''--)	२६८०/-
श्री. सुहास खानझोडे (स्व. मालती देशमुख स्मृतिप्रित्यर्थ)	५००/-
श्री. रामस्वरुप पांडेय (योगसंमेलन देणगी)	१०००/-
श्री. विश्वनाथजी पांडेय (--''--)	५०००/-
श्रीमती इंद्रायणी मोहरीत (--''--)	२१००/-
उत्तरा श्रीकांत देशपांडे (--''--)	५०००/-
योजक व प्रेक्षा (योगसंमेलन देणगी)	२००१/-
दीप्ति देशपांडे (देणगी)	१००१/-
श्री. के.डी. आठवले (--''--)	१०००/-
श्री. मुकुंद सरमुकद्दम (--''--)	११०००/-
श्री. संदीप सेलगावकर (--''--)	११०००/-
डॉ. परिमल तायडे (--''--)	१००००/-
श्री. सुनील त्र्यं. दाणी (--''--)	११०००/-
श्री. प्रशांत काळे (--''--)	११०००/-
अल्का मार्केटींग (संजय मंत्री)	११०००/-
सौ. स्नेहा मिरज गिरोळकर, अमेरिका (--''--)	५०००/-
श्री. मोहन मे साहू (--''--)	५०००/-
श्रीमती संध्या सोमानी (--''--)	५००/-
श्रीमती तनुश्री पनपालिया (--''--)	४००/-
श्रीमती मंगला मुकेवार (--''--)	५००२/-
सुनंदा सुभाष देशपांडे (--''--)	२०००/-
श्री. जीवन देशपांडे (--''--)	११०००/-
श्री. दीपक हलदुले (योगसंमेलन देणगी)	५०००/-
Om Apex Investment Services (P) Ltd. (--''--)	२५०००/-
श्री. नंदकिशोर बोकाडे (--''--)	५५५१/-
टीना जयस्वाल (--''--)	२१००/-
श्री. नितीन बोरवणकर (--''--)	२१०००/-
ईशा देशपांडे (--''--)	१५००१/-
स्मिता देशपांडे (--''--)	१००१/-
श्री. प्रभाकर होरे (--''--)	५०००/-
श्रीमती सीमा बिश्वास (पियुष योगवर्ग सहकारनगर) (--''--)	८५००/-
सौ. गीता व्यं. जयपुरकर (--''--)	११०००/-
श्री. आनंद परचुरे (--''--)	११०००/-
सौ. अलका देवस्थळे (--''--)	५०००/-
श्री. कमलेश शेंडे, ठाणे (--''--)	२१००/-
श्री. नरेश प्रभुदास जसानी (--''--)	२१०१/-
श्री. संजय लिखीतकर (--''--)	११५१/-

ततः किं ततः किं ततः किम् ततः किम् ।।१।।

मे गजानन & Sons, Fire Safety (P) Ltd. (योगसंमेलन देणगी)	२५००/-
श्रीमती मेघा धापोडकर (--''--)	१००१/-
श्री. प्रमोद धापोडकर (--''--)	१००१/-
श्री. गोपीनाथ पिल्लई (--''--)	१००१/-
श्री. प्रशांत ठवरे (--''--)	१००१/-
श्रीमती शालिनी देशपांडे (--''--)	२००१/-
श्रीमती उज्ज्वला कावरे (--''--)	५००१/-
श्री. संजय म. चिखीतकर (--''--)	११५१/-
श्री. गजेंद्र जैन (--''--)	५१००/-
श्री. मुकेश शांतीलाल जैन (--''--)	११००/-
श्री. ताराचंद कावलकर (--''--)	५१००/-
श्री. निशांत पर्बत (--''--)	२१००/-
श्री. अण्णाजी गोडबोले (--''--)	२१००/-
श्री. छगनलाल सावरबांधे (--''--)	११००/-
श्री. दिनेश शाहु (--''--)	२१००/-
श्री. संतोष पांडे (--''--)	२१००/-
श्री. प्रफुल्ल पाटणे (--''--)	११००/-
श्री. पवन जालान (--''--)	२१००/-
श्री. संतोष कोचर, यवतमाळ (--''--)	११०००/-
श्री. राजु वेनसियानी (--''--)	५१००/-
श्री. संजय आपतुरे (--''--)	११०००/-
श्री. तुषार रहाटे (--''--)	२१००/-
श्री. नारायण वांढरे (--''--)	५००१/-
श्रीमती सीमा चौरसिया (--''--)	५०००/-
श्रीमती संजीवनी ज. धोडरीकर (--''--)	२०५१/-
श्री. सर्वेश दिलीप कौशिक (--''--)	२१०००/-
श्री. अविनाश म. खळतकर (--''--)	५००१/-
कल्याणी तम्मा (--''--)	१००००/-
श्री. श्रीकांत भागरीकर (--''--)	११००/-
श्रीमती कोमल मिश्रा (--''--)	५००/-
श्रीमती रेखा वस्तानी (--''--)	११००/-
श्रीमती जयश्री अरुण जोशी (--''--)	१५०००/-
श्रीमती दीपाली धनंजय बापट, पुणे (--''--)	५००/-
श्रीमती दीप्ति शर्मा, पुणे (--''--)	११००/-
श्री. श्याम पी. देशपांडे (--''--)	११०००/-
सौ. अनघा बेंद्रे (--''--)	५०००/-
सौ. भाग्यश्री काशीकर (--''--)	५००००/-
सारिका म. गाडे (--''--)	२१००/-
सौ. साधना गोमेकर (योगसंमेलन देणगी)	३०००/-
श्री. मोरेश्वर आटोणे (--''--)	५०००/-
श्री. सीनीराम कोळमकर (--''--)	१०००/-
श्री. विजय पावडे (--''--)	२५००/-
All India Roporter Pvt. Ltd. (--''--)	२५०००/-
श्री. मधुसूदन विष्णु कुळकर्णी (--''--)	१५००/-
श्री. पन्नालाल श्री. बजाज (--''--)	१०००/-
श्रीमती केतकी अतुल उदापुरे, पुणे (--''--)	५०००/-
श्रीमती प्रिया जोशी, पुणे (--''--)	१०००/-
श्री. नितीन गुजराथी (--''--)	१००१/-
श्रीमती वैखरी मंगेश वझलवार (--''--)	५०००/-
श्री. रितेश कावळे (--''--)	१०००/-
सौ. राधिका रा. नानेकर (--''--)	१०००२/-
श्रीमती सुनीता वाघमारे (--''--)	११००/-
मोहिनी मकरंद जोशी, अमरावती (--''--)	५०००/-
सौ. आरती ठक्कर, अमरावती (--''--)	५०१/-
श्रीमती लक्ष्मीबाई रा. सातपुते (--''--)	१००१/-
सौ. अर्चना आगलावे (--''--)	१०००/-
श्री. प्रशांत आगलावे (--''--)	१०००/-
श्रीमती शशीताई पाठक (--''--)	५००/-
सौ. मनीषा सरोदे जैन (--''--)	५००/-
श्रीमती सुशीलाताई गुडधे (--''--)	५००/-
श्री. अरुण श्रीहरी गाडगीळ (--''--)	५०१/-
सौ. शिवानीताई दाणी वखरे (--''--)	११०००/-
सौ. अर्चना अजय घडे (--''--)	१०००/-
श्री. ऋग्वेद (--''--)	३०००/-
श्रीमती रोहिणी रोडी, बेंगलुरु (--''--)	१००५/-
सौ. रेखा गाडवे, बेंगलुरु (--''--)	२०००/-
श्रीमती पूजा सातीया (--''--)	१०००/-
सौ. वैशाली नंदकिशोर जोशी (--''--)	१०००/-
श्री. केदार नंदकिशोर जोशी (--''--)	१०००/-
श्री. अद्वैत प्रमोद जोशी, परभणी (--''--)	५००/-
श्री. नरेंद्र द. मुळे, छ. संभाजीनगर (--''--)	५००/-
श्रीमती शोभा क. जोशी (--''--)	५००/-
श्री. जयंत सुदामे (--''--)	५००/-
श्री. अभिजीत मुखे (--''--)	१०००/-
श्रीमती ऐश्वर्या गणेश (--''--)	५००१/-
श्री. मारोती भंडारी (--''--)	५०००/-

ज्ञानेश्वर मंदिर योग. मंडळ, बजाजनगर (देणगी) २१००/-
श्री. दीपक देशमुख (योगसंमेलन देणगी) २५०००/-
श्रीमती शोभा भट्टड (--''--) २०००/-
श्रीमती विजया कुळकर्णी (--''--) ५०००/-
श्री. दिलीप जोग (--''--) १०१/-
श्री. सतीश जी बंग (--''--) ५००/-
श्री. दिलीप पोटदुखे, चंद्रपुर (--''--) ५००/-
श्रीपाद भागवत सगदेव (--''--) १०००/-
श्री. सुरेश गोखले (--''--) २००१/-
